# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २६/०२/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २६/०२/२०१३ रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. १८/०२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

१. श्री. राजु यशवंत भोईर
२. श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३. श्रीम. अनिता जयवंत पाटील
४. श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
५. श्री. प्रमोद जयराम सामंत
६. श्री. राजेश शंकर वेतोसकर
७. श्री. रोहिदास शंकर पाटील
८. श्रीम. मिरादेवी यादव
९. डॉ. राजेंद्र जैन
१०. श्री. संदिप मोहन पाटील
११. श्री. प्रविण मोरेश्वर पाटील
१२. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी
१३. डॉ. रमेश जैन

**गैरहजर सदस्य –**

१.) श्री. मुन्ना सिंह
२.) श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन
३.) श्री. शरद केशव पाटील

**मा. सभापती :-**

नमस्कार, श्री. नरेंद्र मेहता भारतीय जनता पक्षाचे ह्यांची जिल्हा अध्यक्ष म्हणुन नियुक्ती झाल्याबद्दल मी स्थायी समिती सदस्य म्हणून सगळ्यांतर्फे त्यांचे अभिनंदन करतो. तसेच सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. २६/०२/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०५, दि. १८/०२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ३४, दि. ०७/०२/२०१३ रोजीचे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**प्रमोद सामंत :-**

दि. ०७/०२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३४ :-**

दि. ०७/०२/२०१३ रोजीचे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३४ :-**

दि. ०७/०२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. प्रमोद सामंत अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३५, वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

(मा. आयुक्तांनी स. ११.४५ वा. मुळ अंदाजपत्रक सादर केले.)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३६, शिक्षण मंडळ समितीने मंजुर केलेले सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. प्रकरण क्र. ३७, परिवहन सेवेचे सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. प्रकरण क्र. ३८, सन २०१२-१३ चे सुधारीत व सन २०१३-१४ चे मुळ "अ'' + "क'' + "अग्निशमन'' + "अंध व अपंग'' + "महिला व बालकल्याण'' + "JNNURM'' + "P'' अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

(मा. आयुक्तांनी स. ११.५० वा. मुळ अंदाजपत्रक सादर केले.)

**मा. आयुक्त :-**

मा. श्री. राजु यशवंत भोईर, सभापती, स्थायी समिती, स्थायी समितीचे सर्व सन्माननिय सदस्य, उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्ग, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१२-१३ चे सुधारित व सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. या अंदाजपत्रकासोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५(अ) नुसार सन २०११-१२ या वर्षात महानगरपालिकेने अर्थसहाय्य देऊन नागरिकांना पुरविण्यांत आलेल्या सेवांबाबतचा अहवाल सुध्दा सादर करण्यांत येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या सन २००१ च्या जनगणनेनुसार ५,२०,३८८ होती, गत दहा वर्षात त्यामध्ये ५६ टक्क्याने वाढ होऊन ती सन २०११ च्या जनगणनेनुसार ८,१४,६५५ इतकी झालेली आहे. या नगराच्या लोकसंख्या वाढीचा दर हा राज्यातील तसेच देशातील इतर नगरांच्या लोकसंख्या वाढीच्या दराच्या तुलनेत अधिक आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे येथील नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा पुरविणे ही अत्यंत आव्हानात्मक जबाबदारी आहे. या महानगरपालिकेचे स्वतःचे उत्पन्न मर्यादित असल्याने केंद्र शासन, राज्य शासन व इतर संस्थांकडून अनुदान वा कर्ज रुपाने अर्थ सहाय्य घेऊन महानगरपालिकेतर्फे ही जबाबदारी पार पाडली जात आहे व या सोबतच शहराचा विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत प्रामुख्याने खालीलप्रमाणे आहेत.**

| | |
|---|---|
| महापालिकेचे स्वतःचे उत्पन्न | रू. ३३७ कोटी |
| केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान | रू. ११९ कोटी |
| राज्य शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान | रू. ११२ कोटी |
| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राप्त होणारे अनुदान / कर्ज | रू. २३४ कोटी |

मिरा भाईंदर महानगरपालिकेस वर नमुद केल्याप्रमाणे अपेक्षित उत्पन्न व प्राप्त झालेले/होणारे अनुदान याची सांगड घालून प्रामुख्याने अत्यावश्यक सेवांवरील खर्चावर प्रथमतः तरतुद करुन उर्वरित अपेक्षित उत्पन्नातून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे विकासकामे करावयाचे योजिले आहे.

| अ.क्र. | बाब | प्रस्तावित तरतुद (रू. कोटी) |
|---|---|---|
| १. | भुयारी गटारे योजना | **१९२.७५** |
| २. | नगरोत्थान पर्जन्य जलवाहिन्या | **१५४.३६** |
| ३. | भाईंदर स्टेशन जेसलपार्क सब-वे | **२०.००** |
| ४. | वॉर्ड साफसफाई/नाले सफाई | **४२.५०** |
| ५. | नविन अतिरिक्त पाणीपुरवठा योजना | **२०.००** |
| ६. | पादचारी मार्ग | **१०.००** |
| ७. | नविन रस्ते | **१७.००** |
| ८. | रस्ते दुरूस्ती | **१५.००** |
| ९. | वृक्ष प्राधिकरण | **१५.२३** |

| | | |
|---|---|---|
| १०. | नविन गटारे/नाले बांधकाम | ८.०० |
| ११. | प्रभाग समिती निधी | ८.०० |
| १२. | भाडे तत्वावरील घरे | ७.९७ |
| १३. | शिक्षणमंडळ | ९.५० |
| १४. | नगरसेवक निधी | ५.२५ |
| १५. | नविन जलवाहिनी टाकणे | ४.०० |
| १६. | नविन अग्निशमन यंत्रे खरेदी | ३.०० |
| १७. | रूग्णालये साहित्य / उपकरणे | १.१५ |
| १८. | महिला व बालकल्याण | २.९७ |
| १९. | आरक्षित जागा संपादन करणे | १.५० |
| २०. | दुर्बल घटकांसाठी योजना | १.०४ |

**या सोबतच येत्या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे नविन योजना प्रस्तावित करण्यात येत आहेत :-**

सन २०११ च्या जनगणनेनुसार या महानगरपालिका क्षेत्रात पुरुष : स्त्री यांचे प्रमाण अत्यंत व्यस्त असून ते दर हजार पुरुषांमागे ८७५ स्त्रिया असे आहे. हे प्रमाण देशातील व परिसरातील नगरांच्या तुलनेने अत्यंत विषम असून यासाठी समाजात जनजागृती निर्माण करणे, या प्रवर्गातील स्त्रियांना वैद्यकिय सेवा पुरविणे व अस्तित्वातील नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे इत्यादींचा अवलंब करून **"बेटी बचाओ"** हा कार्यक्रम हाती घेण्याचे प्रस्तावित केले असून त्यासाठी रु. १५ लाखाची तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

या महानगरपालिका क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या कुटूंबांपैकी बहुतांश कुटूंबातील पती पत्नी मुंबई, ठाणे, नवी मुंबई या परिसरातील आस्थापनामध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या गैरहजेरीमध्ये त्यांच्या मुलांची आबाळ होऊ नये म्हणून स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने ठराविक ठिकाणी **"पाळणाघरे"** सुरु करण्याचा मानस आहे आणि यासाठी अंदाजपत्रकात रू. १५ लाखाची तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

या शहरातील बालकांसाठी अस्तित्वात असलेल्या बालवाड्यांचा विकास करणे व बालकांना सामावून घेण्याची त्यांची क्षमता वाढविणे यासाठी **"बालवाड्यांचा विकास"** हा कार्यक्रम हाती घेण्यात येणार असून त्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये रू. १५ लाखाची तरतुद करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या शाळांतील शिक्षणाचा दर्जा उंचावणे, येथे शिकविणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या विषयात सखोल ज्ञान मिळावे यासाठी त्यांना त्या-त्या विषयाचे प्रशिक्षण देणे, या शिक्षकांना विषयानुरूप पुस्तके उपलब्ध करुन देणे यासोबत अशा शाळामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादींसाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. या कामासाठी राज्य शासनाकडून तसेच विविध माध्यमातून मिळणाऱ्या अर्थसहाय्या व्यतिरिक्त अंदाजपत्रकात रू. १५ लाखाची तरतुद प्रस्तावित केलेली आहे.

आजच्या इंटरनेटच्या युगात या नगरातील युवकांना वाचनाची गोडी लागावी व त्यांनी स्पर्धात्मक परिक्षेत सक्रिय सहभाग घ्यावा यासाठी अस्तित्वात असलेल्या वाचनालयात विविध विषयांवरील पुरेशी पुस्तके उपलब्ध करणे, तेथे अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे, शक्य तिथे स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था करणे इ. कार्यक्रम हाती घेण्याचे योजिले आहे व त्यासाठी अर्थसंकल्पात रू. १५ लाखाची तरतुद सुचविण्यात आलेली आहे.

या नगरातील विद्यार्थ्यांना विशेषतः महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना विविध क्रिडा प्रकारांची गोडी लागावी व त्यांच्यातील अंगभूत कलागुणांना वाव मिळावा म्हणून विविध क्रिडा स्पर्धा/सांस्कृतिक स्पर्धा घेण्याचे या महानगरपालिकेचे प्रयत्न आहेत व त्यासाठी रू. ३५ लाखाची तरतुद प्रस्तावित करण्यांत आलेली आहे.

शहरातील ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सुखमय व्हावे व त्यांच्या प्रती असलेली आदराची भावना अभिव्यक्त व्हावी यादृष्टीने ज्येष्ठ नागरिकांसाठी **"विरंगुळा केंद्र"** उभारणे प्रस्तावित आहे. यासाठी रू. १५ लाख इतकी तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर शहराचा परिसर तिनही बाजूंनी समुद्र/खाडी यांनी वेढलेला आहे. या नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण व्हावे या हेतूने समुद्र व खाडी तटावर प्रायोगिक तत्वावर तिवरांची लागवड करण्यासाठी रू. ५ लाख, तसेच विविध शासकिय, निम शासकिय संस्था यांच्या सहकार्याने **"जैव विविधता उद्यान"** स्थापित करण्याचा मनोदय पुर्णत्वास नेण्यासाठी तुर्त रू. ५ लाखाची तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. वृक्ष लागवडीमध्ये जनतेचा सहभाग वाढावा म्हणून शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, गृहनिर्माण संस्था व शहरातील नागरिक यांच्यासाठी **"स्मृती वृक्ष लागवड योजना"** तयार करण्यात येत असून त्यासाठी रू. ५ लाखाची तरतुद प्रस्तावित करण्यांत आलेली आहे.

या महानगरपालिकेची आर्थिक उत्पन्नाची साधने मर्यादित असूनही येत्या वर्षात म्हणजेच सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात कोणतेही नविन कर किंवा दरवाढ सुचविण्यांत आलेली नाही हे सांगण्यास मला आनंद होत आहे. तथापी, या महानगरपालिकेकडील उपलब्ध असलेली साधन-सामुग्रीचा प्रभावीपणे व कार्यक्षमतेने वापर करुन या शहरातील नागरिकांचे जीवन सुखकर होईल असे प्रयत्न करण्यात येतील अशी मी ग्वाही देतो. येत्या

वित्तीय वर्षात रक्कम रुपये १०५५ कोटी २५ लक्ष ४० हजार इतके अपेक्षित उत्पन्न व १०५५ कोटी १३ लक्ष ६५ हजार इतका अंदाजित खर्च वजा जाता रक्कम रुपये ११ लक्ष ७५ हजार इतक्या शिल्लकीचे अंदाजपत्रक सादर करण्यांत येत आहे.

सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात महानगरपालिकेकडून विकास कामांसोबतच या नगरातील जनतेस आवश्यक नागरी सेवा सुविधा देऊन लोकाभिमुख प्रशासन राबविण्यासाठी आपले सर्वांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभेल अशी मी अपेक्षा करतो. धन्यवाद!

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३९, भाईंदर (पूर्व) बंदरवाडी (खारी) स्मशानभूमी Smoke Exhaust System बसविण्याच्या निविदेस मान्यता देणे.

**राजेश वेतोसकर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) बंदरवाडी स्मशानभूमीच्या सभोवताली इमारती असल्याने प्रेत दहन झाल्यावर निघणाऱ्या धूरामुळे इमारतीमधील रहिवाश्यांना त्रास होत असल्याने सदर ठिकाणी निघणारा धूर उंच आकाशात सोडणे करीता सदर ठिकाणी Smoke Exhaust System बसविणे व त्याकरीता रक्कम रू. २७.०० लक्ष येणाऱ्या खर्चास मा. स्थायी समिती सभा दि.०५/०१/२०१३ अन्वये मंजूरी मिळाली आहे. त्यानूसार सदर कामाकरीता दि.२१/०१/२०१३ रोजी निविदा मागविण्यात आल्या असता दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यामुळे सदर कामाकरीता दि.२२/०१/२०१३ रोजी प्रथम मुदत वाढ व दि.२८/०१/२०१३ रोजी मुदतवाढी देण्यात आल्या असता सदर कामी १) मे. विनिअर कॉम्प्रेसर लि. २) मे. एअर इक्वीपमेंट ॲण्ड सिस्टम्स इंडीया प्रा.लि. यांच्या निविदा प्राप्त झाल्या.

सदर कामी सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये **"स्मशानभूमी विकास"** या लेखाशिर्षकाखाली रु. ३०.९६ लक्ष इतकी तरतुद उपलब्ध आहे.

| | | | **M/s. Winair Compressor Limited** |
|---|---|---|---|
| **Item. No.** | **Description** | **Unit** | **Rate Per Unit** |
| 1 | Supply, Fabrication, Erection. Testing and Commissioning of Smoke Exhaust Systems work conforming to material specifications as per good engineering practices including all necessary fittings. Price to include for all fittings such as slip – on/blind flanges, bends, tees elbows, couplings, eccentric reducers, expander unions, check nuts, local pipe supports include for 1 coat of primer and 2 coats of paint of any pigment. | **Set** | **27,06,500/-** |
| 2 | 1. Hood<br>2. Hopper<br>3. Chimney<br>4. <u>Supports</u><br>a. I beam<br>b. Angles<br>5. <u>Main Header</u> Distribution Pipe<br>6. Flange<br>7. Pipe & Fittings<br>8. Material Handling<br>9. Miscellaneous<br>10. Blowers<br>11. Compressor<br>12. Filters<br>13. Fabrication & Erection | **Part of Set** | |

वरील प्रमाणे मे. विनिअर कॉम्प्रेसर लि. यांच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नूसार मान्यता देण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

उसमें लिखा नही है। वह अलग आयटम नहीं है और उसपर डेट नहीं लिखा हुआ है। उपर जो ४७ लॅक्स लिखा हुआ है। उसके निचे नही लिखा है। उपर में जो पार्ट है, वह सेकंड जो दिया है। इसमें सेट एक ही है ना। लेकिन लिखा नहीं है इसके अंदर।

**दिपक खांबित :-**

एकही सेट है। एकी बैठनेका है। इसके सब आयटम चाहिए।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सेकन्ड कॅटॅगरी के आते है ना।

**दिपक खांबित :-**

वह दोनो निकालना चाहिए।

**मिरादेवी यादव :-**

साहब, काशिमिरा के उधर भी स्लम एरिया है, उधर भी चिमणी का जो है वह उपर किया जाए। और जिसपे मय्यत जलाई जाती है।

**दिपक खांबित :-**

साहेब, तिकडे पण सर्व्हेक्षण केलेले आहे. आणि त्याच ही अंदाजपत्रक प्राप्त होईल आपल्याला पुढील दिवसांनी. म्हणजे तिथे सुध्दा बंदरवाडी सारखी परिस्थिती आहे. ह्यांची ४-५ पत्र आहेत. त्याप्रमाणे मी पाहणी करुन पुढच्या बजेटमध्ये तरतुद झाली तर पुढच्या वेळेला तो ही विषय आणु.

**प्रकरण क्र. ३९ :-**

भाईंदर (पूर्व) बंदरवाडी (खारी) स्मशानभूमी Smoke Exhaust System बसविण्याच्या निविदेस मान्यता देणे.

**ठराव क्र. ३५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) बंदरवाडी स्मशानभूमीच्या सभोवताली इमारती असल्याने प्रेत दहन झाल्यावर निघणाऱ्या धूरामुळे इमारतीमधील रहिवाश्यांना त्रास होत असल्याने सदर ठिकाणी निघणारा धूर उंच आकाशात सोडणे करीता सदर ठिकाणी Smoke Exhaust System बसविणे व त्याकरीता रक्कम रू. २७.०० लक्ष येणाऱ्या खर्चास मा. स्थायी समिती सभा दि.०५/०१/२०१३ अन्वये मंजूरी मिळाली आहे. त्यानूसार सदर कामाकरीता दि.२१/०१/२०१३ रोजी निविदा मागविण्यात आल्या असता दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यामुळे सदर कामाकरीता दि.२२/०१/२०१३ रोजी प्रथम मुदत वाढ व दि.२८/०१/२०१३ रोजी मुदतवाढी देण्यात आल्या असता सदर कामी १) मे. विनिअर कॉम्प्रेसर लि. २) मे. एअर इक्वीपमेंट ॲण्ड सिस्टम्स इंडीया प्रा.लि. यांच्या निविदा प्राप्त झाल्या.

सदर कामी सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये **“स्मशानभूमी विकास”** या लेखाशिर्षकाखाली रु. ३०.९६ लक्ष इतकी तरतुद उपलब्ध आहे.

| | | | **M/s. Winair Compressor Limited** |
|---|---|---|---|
| **Item. No.** | **Description** | **Unit** | **Rate Per Unit** |
| 1 | Supply, Fabrication, Erection. Testing and Commissioning of Smoke Exhaust Systems work conforming to material specifications as per good engineering practices including all necessary fittings. Price to include for all fittings such as slip – on/blind flanges, bends, tees elbows, couplings, eccentric reducers, expander unions, check nuts, local pipe supports include for 1 coat of primer and 2 coats of paint of any pigment. | **Set** | **27,06,500/-** |
| 2 | 14. Hood<br>15. Hopper<br>16. Chimney<br>17. Supports<br>c. I beam<br>d. Angles<br>18. Main Header<br>Distribution Pipe | **Part of Set** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 19. Flange<br>20. Pipe & Fittings<br>21. Material Handling<br>22. Miscellaneous<br>23. Blowers<br>24. Compressor<br>25. Filters<br>26. Fabrication & Erection | | |

वरील प्रमाणे मे. विनिअर कॉम्प्रेसर लि. यांच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नूसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. राजेश वेतोसकर अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४०, भाईंदर (पूर्व) जैसल पार्क खाडी किनारी जलक्रिडा प्रकल्प चालविणे कामाच्या निविदेस मान्यता देणे.

**प्रमोद सामंत :-**

गोषवारा पहाता ठेकेदाराने महानगरपालिकेस देऊ केलेली वार्षिक रक्कम कमी वाटते. तरी फेर निविदा मागविण्यात यावी.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे जे काम आहे. याला हा प्रकल्प राबवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या आपल्याला मिळालेल्या आहेत का?

**दिपक खांबित :-**

सगळे परमिशन प्राप्त झालेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आम्ही या शहराच्या विकासाच्या दृष्टीने लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने आणि या महापालिकेची प्रतीमा अन्य महापालिकेमध्ये निटनेटकी रहावी या दृष्टीने अनेक वर्षे आम्ही इथे विधीशेडची मागणी करतो. आपल्या पहिल्या महासभेने आणि स्थायी समितीने विधी शेड निर्माण करण्यासाठी ६६ लाखाच काम मंजूर केल. ते काम नियमात बसत नाही म्हणून थांबवल. परवा दिवशी आपले सदस्य शरद पाटलांच्या आईचा विधी चालू होता. मुंबईच्या महापालिकेचे सभासद इथे आले होते. विरार-वसई महापालिकेचेही सभासद इथे आले होते. आणि हसण्यावारी झाले. ३००-४०० लोक असताना काका काय आहे ह्याचे छपरे उडलेले आहेत. हे काम करणे आवश्यक आहे. ह्याला आपण कायदेशीर अडचण सांगतो आणि ही जलद प्रक्रिया याच्यावर विरोध असण्याचा काही कारण नाही. ह्याच्यात टिपणी आपण अशी लिहतो परवानगी दिलेली आहे. नगरसेवक निधीतुन साहित्य खरेदी करण्यात आलेल आहे. ज्या गोष्टीची खरोखर पुर्तता झाली आहे की नाही झाली. जर सी.आर.झेड ची परवानगी असेल तर सी.आर.झेड ची परवानगी कधी मिळाली? साहित्य कधी खेरदी केल? आणि साहित्य खरेदी केल असेल तर जर त्याच्यासाठी पैसे मंजूर केले. स्थायी समिती आहे ना. ते साहित्य आता जस हे स्मशानभूमीच स्टँडींगला पहिल्यांदा परवानगी दिली. आता आपण परत ठेकेदाराला हि परवानगी देतो. निविदाला परवानगी देतो. याच्या निविदा आल्या होत्या का? निविदा समोर आलेल्या नाही. प्रोजेक्ट चांगल असेल तर ठिक आहे. पण एका प्रोजेक्टला एक न्याय आणि दुस-या प्रोजेक्टला दुसरा न्याय येता कामा नये. महापालिकेच्या हद्दीत चेना ते उत्तन पर्यंत जी सगळयांच्या हितीची योजना असेल त्याला सर्व सभासदांनी किंवा अधिका-यांनी आपली पारदर्शक भूमिका ठेवायला पाहिजे. ह्याच्यातल आमच्या लक्षात येत नाही. ते काम का राहिल? आणि हे काम सरळ समोर कसे आले?

**दिपक खांबित :-**

काका, गोषवा-यामध्ये म्हंटल आहे. मा. स्थायी समिती दि. ८/५/२०१२ ठराव क्र. १६ अन्वये ही टेंडर आपण मंजूर केल. आणि हे साहित्य वैगेरे आपण खरेदी केल आहे. त्याच्यावर अजून आपण ताबा नाही घेतलेला आहे. ताबा का नाही घेतला तर आपण अजून पर्यंत चालवल नाही रनिंग करत कॉन्ट्रॅक्ट फिक्स नाही केल. म्हणून ते आपण ताब्यात नाही घेतल आहे.

**रोहिदास पाटील :-**

कोणत?

**दिपक खांबित :-**

हे जे बोटिंग आणि बोटिंग जेटी आहे. ते आपण खरेदी केल आहे. आपण आपल्या ताब्यात अजूनपर्यंत कॉन्ट्रॅक्टर काढून घेतलेल नाही. कारण आपल रनिंगच कॉन्ट्रॅक्ट झाल नाही ना.

**रोहिदास पाटील :-**

खरेदी केल म्हणजे. आपली परवानगी आलीच नाही तर त्याच्यावर खरेदी कशी होईल?

**दिपक खांबित :-**

परवानगी आहे ना साहेब, मेरिडॅम बोर्डाकडून परवानगी आहे.

**रोहिदास पाटील :-**

कोणत्या तारखेला परवानगी आली आहे?

**दिपक खांबित :-**

त्याच जागेवरती.

**रोहिदास पाटील :-**

त्या जागेवर आपण जे-जे प्रकल्प राबवतो. त्याच्यासाठी आवश्यक असलेल्या सगळ्या परवानग्या .........

**दिपक खांबित :-**

कला क्रिडा प्रकल्पाकरीता मेरीडॅम बोर्डाची परमिशन लागते ती आलेली आहे. त्यानंतर तुम्ही जो विषय मांडला की, तिकडे विधीकारी शेड आहे. त्याचे आपण टेंडर पास केल होत. त्याचा सी.आर.झेडमध्ये होत. त्यानंतर धक्का अरुंद आहे. तो रुंद करण्याकरीता आपण प्रस्ताव केला होता. आणि तिसर एस.टी.पी.च्या मागे बांधलेला आहे ना. पार्क किंवा फुटबॉलच ग्राऊंड ह्या तीन गोष्टीकरीता हा प्रस्ताव सी.आर.झेड ऑथोरीटीकडे पाठवल होत. दि. ५/११/२०१३ ला जी मिटींग झाली त्याच्यामध्ये प्रस्ताव मंजूर झाले. आणि त्यामध्ये काही अटी घालून आपल्याला ह्या तीन कामांची मंजुरी दिलेली आहे. बाकी जी रस्त्याची पाच काम होती. जेसल पार्क घोडबंदर रस्ता त्याला त्यांनी हायकोर्टात जाऊन मंजूरी घ्यायला सांगितले. आणि जिथे-जिथे टिवऱ्यांची झाड आहेत. त्याचे रिप्लॅनटेशनचा प्रस्ताव तयार सादर करायला सांगितला आहे. आणि तिसर सांगितल आहे की, जिथे मॅंग्रोजची झाड आहेत तिथे रस्ता घेताना स्ट्रीट बांधा, अशा तीन अटींवर परमिशन दिलेली आहे. पर्यावरण विभागाने त्याप्रमाणे पुढच इस्टीमेट करतो. आणि तुम्ही जे बोलता विधीकारी शेड त्याला त्यांनी नुतनीकरण करायला परमिशन दिले. आणि जे काम होत ते जून होत. आणि ह्या तीन्ही कामाच नविन इस्टीमेट करुन सादर करतो. आवश्यकता मंजूरी घेतो.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला सांगायला पाहिजे ना.

**दिपक खांबित :-**

दाखवल होत. परवा दिवशी दाखवल होत.

**रोहिदास पाटील :-**

हे आल म्हणून आम्ही विचारल ना.

**दिपक खांबित :-**

त्या दिवशी तुम्हाला दाखवल होत.

**रोहिदास पाटील :-**

दाखवले म्हणजे. हा अजेंडा आमच्या हातात आल्यानंतर ह्या कामाला परवानगी मिळते. मग विधी शेडला का नाही मिळत? साहेब जे धक्का रुंदीच आहे म्हणजे जवळ जवळ चार वर्ष झाल. आम्ही प्रयत्न करतो. आम्ही कायमचे त्या धक्क्यावर गणपती विसर्जन करणारी लोक आहेत. एक नाही आहेत आता पण आम्ही आहोत. धक्का अरुंद असल्यामुळे आपले गणपती विसर्जन सकाळी साडेनऊ दहा वाजेपर्यंत चालू असते. तोच धक्का जर रुंद झाला तर त्या धक्क्यावरच विसर्जन रात्री ३-४ वाजेपर्यंत संपले. अशी प्रामाणिक आमची मागणी आहे. ह्याच उत्तर अस असते की, परवानगी नाही. कॉंक्रीट नाही. काही नाही जेणेकरुन बोर्ड लागले पाहिजे. जेणेकरुन गणपती खाली उतरले पाहिजे. नाही झाल. आता परवानगी मिळाली तर आम्ही तुमच ही अभिनंदन करतो. सभापतींच अभिनंदन करतो. पण ज्या दिवशी आल त्या वेळेला आमच्या पत्राला उत्तर द्यायला पाहिजे. परवानगी मिळाली नाही. आमची पुन्हा पुन्हा १०-१०, १५-१५ रिमाइंडर पत्र येतात. तुम्ही ठेवून देतात.

**दिपक खांबित :-**

साहेब उत्तर पाठवल होत. तुम्हाला मिळाल नसेल.

**रोहिदास पाटील :-**

नाही मिळाल. किती तारखेचा आहे?

**दिपक खांबित :-**

कालच आहे.

**रोहिदास पाटील :-**

ठिक आहे.

**डॉ. रमेश जैन :-**

मा. आयुक्त साहेब इसमें लिखा हुआ है की, सन्मा. नगरसेवक कौन-कौन ने अपनी निधी दी है?

**दिपक खांबित :-**

माजी महापौर तुळशीदास म्हात्रे, मदन सिंगजी है, प्रभात पाटील मॅडम, मिलन पाटील, सभापती कल्पना म्हात्रे मॅडम का निधी है। इन्होंने पैसा दिया है। नर्मदा वैती मॅडम है। उमा पाटील, शशिकांत भोईर साहेब, सुनिता भोईर मॅडम ह्या लोकांनी मिळून ८० लाख रु. दिले ह्या प्रकल्पासाठी.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. सभा संपली असे मी जाहिर करतो. आणि मूळ अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी सर्व सदस्यांना कळविण्यात येईल. चर्चेचा कार्यक्रम लवकरात लवकर कळविण्यांत येईल.

**प्रकरण क्र. ४० :-**

भाईंदर (पूर्व) जैसल पार्क खाडी किनारी जलक्रिडा प्रकल्प चालविणे कामाच्या निविदेस मान्यता देणे.

**ठराव क्र. ३६ :-**

गोषवारा पहाता ठेकेदाराने महानगरपालिकेस देऊ केलेली वार्षिक रक्कम कमी वाटते. तरी फेर निविदा मागविण्यात यावी.

**सुचक :- श्री. प्रमोद सामंत** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दुपारी १२.१५ वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**